**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक -१७**

विषय क्रमांक-१ दिनांक :-२/०२/२००७

ठराव क्रमांक -१ दिनांक :- २/०२/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००६-२००७ सालचे सुधारित व सन २००७-२००८ सालचे मा.आयुक्त साहेब, सादर करणार असलेले मुळ अंदाज पत्रक (महानगरपालिका स्कुल बोर्डा सह) विचारार्थ

अंदाजपत्रकीय सभा दिनांक २/०२/२००७ रोजी बोलावलेली व पुढे दिनांक ५/०२/२००७ दिनांक ६/०२/२००७ व दिनांक ७/०२/२००७ रोजी चालू असलेल्या सभेमध्ये मा.स्थायी समिती सदस्य यांनी खालील प्रमाणे सुचना केल्या व त्यांची मते मांडली.

मा.सभापती साहेब :- शहर हद्दीतील नळ कनेक्शन धारकांना मिटरने पाणी पुरवठा करणे बाबत प्रस्ताव मंजूर करणेस शिफारस करावी.

मा.श्री. जोशी अ.सु. :- अपार्टमेंट (फ्लॅट सिस्टीम ) मधील फ्लॅट धारकांसाठी मिटर ग्रुप नळ कनेक्शन सिस्टीम चालू करण्यांत यावी व अशा इमारती मधील सर्व फ्लॅट धारकांनी मिटर सिस्टीम लागु करून घेतलेस त्यांना जनरल पाणी पट्टी आकारू नये. आणि अर्धा इंची रहिवासी नळ कनेक्शन धारकांनी मिटर पध्दतीचा अवलंब केले नंतर नळाला पाणी आले नाही. तर दरमहा रूपये पन्नास प्रमाणे सरासरी ने पाणी पट्टी त्यांचे कडून घ्यावी.

मा.श्री.बोरूडे अ.ब.:- कमर्शिअल अर्धा इंची नळ कनेक्शन धारकांनी मीटर पध्दतीचा अवलंब केले नंतर नळाला पाणी आले नाही. तर दरमहा तीनशे पन्नास प्रमाणे सरासरीने पाणी पट्टी त्यांचे कडून घ्यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज.व मा.श्री. जोशी अ.सु. :- कमर्शिअल इमारतीना मिटर सिस्टीमने पाणी पुरवठा करणे कंपलसरी करावे.

मा.सभापती साहेब :- आरोग्य विभागाने सादर केल्या प्रमाणे सोनोग्राफी शुल्क आकारणी बाबत ऑफीस रिपोर्ट मंजूर करणेस शिफारस करण्यांत यावी. तसेच ओला व सुका कचरा वेगवेगळा साठवून ठेवणे आवश्यक आहे. नागरिकांनी सुचनांचे उलंघन केल्यास रूपये पन्नास ऐवजी रूपये वीस दंड आकारणेत यावा.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:- ओला व सुका कचरा वेगवेगळा ठेवणे साठी महानगरपालिकेने छोटे कंन्टेनर पुरवावे.

मा.श्री.जोशी अ.सु. :- अहमदनगर महानगरपालिका जकात नियम सुधारणा करणे. बाबत माहिती तंत्रज्ञान विषयीचा प्रस्ताव मंजूर करणे बाबत शिफारस करण्यांत यावी.

मा.श्री.घुले अ.ह. व मा.श्री. तिवारी सु.र. :- शहर हद्दीतील मालमत्ता धारकांनी सोलर सिस्टीम, बायोगॅस सयंत्र व रेन वॉटर हार्वेस्टींग या पैकी दोन योजना राबविल्यास त्यांना त्याच वर्षा करिता १० % प्रमाणे मालमत्ता करात सवलत द्यावी आणि नवीन बांधण्यांत येणा-या इमारतीचे मालकांना सदरच्या तीनही योजना राबविणे बंधनकारक करावे.

मा.श्री. मैड स.ब.:-स्ट्रीट लाईटचे बील कमी करणे बाबत चा कार्यालयीन प्रस्ताव मंजूर करणेस शिफारस करावी.

मा.श्री. जोशी अ.सु. :- मा.सदस्यांनी सुचविलेली आवश्यक ती कामे तातडीने होत नाहीत वॉर्ड मधील कामे तातडीने घेणे करिता मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी हे या बजेट हेड वरील तरतूद प्रत्येंक नगर सेवकांचे कामासाठी कमीत कमी दहा लाख येईल अशी करण्यांत यावी.

मा.श्री सय्यद सा.आ.,मा.श्री तिवारी सु.र. - जास्तीत जास्त तरतूद ठेवण्यांत यावी त्या मधून नगर सेवकांनी सुचविलेल्या प्रमाणे कामे करता येतील.

मा.श्री. जोशी अ.सु.:-इमारत दूरूस्ती करीता केलेली रक्कम रूपये पन्नास लाखाची तरतुद ही जास्त आहे

मा.सभापती साहेब :- इमारत दूरूस्ती या बजेट हेड वर रूपये पस्तीस लाख तरतुद ठेउन रूपये पंधरा लाखाची तरतुद मा.सदस्य प्रभाग स्वेच्छानिधीत समाविष्ट करावे. प्रभाग किरकोळ दूरूस्ती झोन प्रमाणे साठी रूपये पस्तीस लाख रूपयांची तरतुद केलेली आहे.

मा.श्री जोशी अ.सु. :- मागिल वर्षी ही रूपये पस्तीस लाखची तरतुद करण्यांत आली होती. मात्र खर्च फक्त रूपये एकतीस हजार झाला आहे. आम्ही सुचविलेली कामे या बजेट हेड खाली होउ शकत नाहीत म्हणून केलेली नाहीत.

मा.सभापती साहेब :- प्रभागात किरकोळ दूरूस्ती झोन प्रमाणे या बजेट हेड वरील तरतुद कमी करून रूपये पंधरा लाख ठेवण्यांत यावी. व उर्वरीत तरतुद मा.सदस्य प्रभाग स्वेच्छानिधीत समाविष्ट करावी.

मा.श्री. जोशी अ.सु. :- विद्युत साहित्य खरेदी, १५० वॅट सोडीयम व्हेपर पोल टाकणे, नवीन इले. पोल स्ट्रीट लाईट स्पॅन फिटींग या बजेट हेडवर अनुक्रमे ४५,२५ व ४० लाख रूपयांची तरतुद केलेली आहे. मा.सदस्यांनी मागणी करून ही इलेक्ट्रीक साहित्याचा पुरवठा होत नाही .नागरिकांच्या तक्रारी वाढतात त्या करिता या बजेट हेड वरील तरतुदी कमी करून मा.सदस्य प्रभाग स्वेच्छानिधीत समाविष्ठ करावी.

मा.सभापती साहेब :- विद्युत साहित्य खरेदी, १५० वॅट सोडियम व्हेपर पोल टाकणे, नवीन इले. पोल स्ट्रीट लाईट स्पॅन फिटींग या बजेट हेडवर अनुक्रमे रूपये ३५ लाख, रूपये वीस लाख व रूपये तीस लाख ठेउन उर्वरीत तरतुद मा.सदस्य प्रभाग स्वेच्छानिधीत समाविष्ठ करावी.

मा.श्री.जोशी अ.सु. :- रस्ते दुरूस्ती साठी रूपये दोन कोटी एक्याऐंशी लाखाची तरतुद केलेली आहे.

मा.श्री.मैड स.ब. :- या कामीची तरतुद पुरत नाही असे सांगतात. मा.नगरसवेकांचे किरकोळ रस्ता दूरूस्तीची कामे होत नाहीत.नागरिक तक्रार करतात.

मा.सभापती साहेब :- या बजेट हेडवर रूपये दोन कोटी पन्नास लाखाची तरतुद ठेउन उर्वरीत तरतुद मा. सदस्य प्रभात स्वेच्छानिधीमध्ये समाविष्ट करावी.

मा.सभापती साहेब :- विकास भार या लेखा शिर्षा मध्ये सध्या असलेल्या शिल्लक व आगामी वर्षा मध्ये जमा होणा-या तरतुदी मधून बेग पटांगण येथील प्रशासकीय इमारत व व्यापारी संकुलाचे इमारतीचे काम खाजगी करणातून (BOOT तत्वावर) न करता ते महानगरपालिके मार्फत बांधणेत यावे व सदरचे काम लवकर होणेसाठी आवश्यक ती उपाय योजना करावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- भु. संपादन या बजेट हेड वरील तरतुद कमी करणेत यावी.आपली जास्त कामे नाहीत.

मा.सभापती साहेब :- भु.संपादन या लेखा शिर्षा वरील केलेली तरतुद चौतीस लाख रूपयांनी कमी करून रूपये चौत्तीस लाखाची तरतुद मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छनिधित समाविष्ट करावी.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- टॉपअप पेट्रोल पंप ते दर्गादायरा, पावन गणपती मंदिर ते बॉम्बे कॉलनी, वाबळे कॉलनी ते इस्लमीयॉ बेकरी या रस्त्यावर स्ट्रीट लाईट चे काम करण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- घासगल्ली येथील टायटन शो रूम ते सुवालालजी गुंदेचा घरापर्यंतची गटर चार फुटी व्यासाचे पाईप मध्ये करणेत यावी. तसेच सबजेल चौक ते (सीना-नदी) सरकारी संडास पर्यत गटरचे काम करण्यांत यावे.तसेच अहमदनगर शहराचे मध्यवर्ती भागातील रस्त्यातील पाण्याची पाईप लाईन बदलणे तसेच गटर्सचे काम करून रस्त्याचे डांबरी करण मजबुती करण करणेचे काम भाग निहाय टप्या टप्याने महानगरपालिका फंडातुन अगर वेळ, प्रसंगी कर्ज उभारणी करून करण्यांत यावे.

मा.बारस्कर पो.ज.:- मनमाड हायवे ते गांधीनगर, बोल्हेगांव फाटा ते बोल्हेगांव रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसवावी. तसेच नागापुर येथील स्मशान भूमि साठी रू.पांच लाख व बोल्हेगांव येथील स्मशान भूमिसाठी रू. दहा लाखाची तरतुद करावीत.

मा.सभापती साहेब :- नेप्ती नाका ते उड्डाणपुल पर्यत चे नगर कल्याण रोड वर स्ट्रीट लाईटचे तसेच दातरंगे मळा गटारी पासून सीना नदी पुला पर्यतचे वारूळाचा मारूती या रस्ताचे डांबरी करण सुशोभिकरण तसेच स्ट्रीट लाईट चे काम करावे.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- निलक्रांती चौक ते सावेडी गावा पर्यत चे बालीकाश्रम रस्त्याचे डांबरी करण सुशोभिकरण तसेच स्ट्रीट लाईटचे काम करण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- अंतर्गत सुधारणा बजेट हेड मधील तरतुदी मधून नगरकल्याण रोड वरील भावणाऋषी, आदर्श नगर, शिवाजीनगर, माधवनगर, श्रीकृष्णनगर, इत्यादी भागातील ले आउट मधील अंतर्गत रस्त्यांची कामे करावीत.तसेच केडगांव मुंकुदनगर फकीरवाडा, बोल्हेगांव,नागापुर, बुरूडगांव इत्यादी उपनगर मधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण सुशोभिकरण करणे व स्ट्रीट लाईटचे काम मनपा फंडातुन अगर वेळ प्रसंगी कर्ज उभारणी करून करणेत यावे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :-चिपाडे मळयातील नाल्या वरील पुलाचे एस्टीमेट प्रशासकीय मंजूरी साठी त्वरीत स्थायी समिती पुढे ठेवावे. तसेच सारसनगर मुकुंदनगर इ. भागासाठी टॅन्करने पाणी पुरवठा करणे साठी दर वर्षी पंधरा लाखा पर्यत महानगरपालिका खर्च करते .तीन वर्षात त्या कामी बराच खर्च झालेला आहे. हा खर्च टाळण्यासाठी वसंत टेकडी ते शोभा सदन पर्यत पाण्याची पाईप लाईन टाकणे शांतीनगर टाकी जवळ पांच लाख लिटरचा जलकुंभ उभारणे पाणी टाकीमध्ये शिप्ट करणे. विषयी काम त्वरीत करावे. टॅन्करने पाणी पुरवठा करणेचा खर्च कमी करावा.

मा.सभापती साहेब :- मागिल वर्षी  पेक्षा चालू वर्षी टॅन्करने पाणी पुरवठा करणे साठी टॅन्कारची संरव्या कमी केलेली असून या लेखा शिर्षावरील तरतुद वीस लाखाने कमी करून उर्वरीत तरतुद मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छानिधी मध्ये समाविष्ट करावी. शिवाजीनगर आदर्शनगरसाठी पाण्याची टाकी बांधावी

मा.श्री.त्रिपाठी सु.चं.:-अंदाजपत्रकामध्ये पुर नियंत्रण हे लेखा शिर्ष तयार करून त्यावर टोकन प्रोव्हीजन करावी.

मा.सभापती साहेब :- महापौर क्रीडा स्पर्धेसाठी केलेली तरतुद कमी असून ती वाढवून पस्तीस लाख करावी. व त्या मधून कबड्डी, क्रिकेट, खो- खो, कुस्ती, शरीर सौष्ठव इत्यादी सार्धा भरविण्यांत याव्यात तसेच शहर विकासा साठी रस्ते विकास प्रकल्प राबविणे करिंता आणि कर्मचारी सानुग्रह नुदान  या प्रमाणे नवीन बजेट हेड तयार करून त्यावर प्रतॅकी रूपये पांच लाखाची तरतुद करावी.

मा.सौ.भागानगरे म.प्र.:- महात्मा फुले चौक ते सारस पुल व पटवा केटरर्स ते नामगंगा या रस्त्याचे कॉक्रटी करावे. सारसनगर परिसरातील रहदारी साठी हे काम होणे अत्यंत आवश्यक आहे.

मा.श्री. त्रिपाठी व मा.सौ. भागानगरे म.प्र. :- सारसनगर येथे पाण्याची टाकी बांधावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- नागापुर व बोल्हेगांव परिसरातील भागात पाणी पुरवठा करणे कामी पाण्याची टाकी बांधावी. तसेच मनमाड रोड ते बोल्हेगांव, बोल्हेगांव फाटा ते बोल्हेगांव करिता सहा  इंची जी  आय पाईप लाईन टाकणेत  यावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- राष्ट्र संत आनंदऋषी महाराज यांचे समाधी स्मारका जवळील चौकामध्ये भगवान महावीरांचा पुतळा उभारणे कामी रूपये दहा लाखाची तरतुद करावी. तसेच शहराचे एका बाजूस बाळासाहेब देशपांडे उघ्यान, लक्ष्मी उघ्यान, नानानाणी पार्क असून मिस्कीन मळा येथे बागेचा प्रकल्प उभारण्यांत येत आहे. परंतु शहराच्या दूस-या बाजूचे मुंकुदनगर ते केडगांव पर्यत एक ही बाग नाही. वाडीया पार्क येथील बाग क्रिडा संकुला मुळे नष्ट झाली आहे.म्हणून मुंकुदनगर, सारसनगर, भवाणीनगर, पुनम मोतीनगर, ते केडगांव या प्रतेंक भागात प्रतेंकी पंधरा लाखा पर्यतची बाग व सांस्कृतिक भवन उभारण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- त्याच प्रमाणे मा.सदस्यांनी चर्चे मध्ये सुचविल्या नुसार वेगवेगळया खर्चाचे लेखा शिर्षा वरील कमी केलेली तरतुद मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छानिधीत समाविष्ट करून मा.नगरसेवकांनी त्या मधून वॉर्डातील आवश्यक रस्ते, पाणी, लाईट इत्यादी संबंधीची कामे करावीत.

**ठरावः-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.आयुक्त साहेब यांनी तयार केलेले व स्थायी समिती कडे सादर झालेले. अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००६-२००७ सालचे सुधारित व सन २००७-२००८ सालचे बाबवार अंदाजपत्रक मनपा स्कुल बोर्डा सह तसेच सन २००७-२००८ सालचे अंदाजपत्रका सोबतचे .

**प्रस्ताव क्रमांक एक** -आरोग्य विभाग यांचा अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा.दे.देशपांडे दवाखाना येथील सोनोग्राफी शुल्कदर आकारणी बाबत.

**प्रस्ताव क्रमांक दोन** -आरोग्य विभाग यांचा ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे बाबत व दंड करणे बाबत.

**प्रस्ताव क्रमांक तीन** -माहिती तंत्रज्ञान धोरण मा.शासनाच्या औघ्योगिक धोरणानुसार अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात व लगत भागात नव्याने येणारे माहिती तंत्रज्ञान या उघ्योगासाठी जकाती मध्ये सवलत देणे कामी जकात नियमात सुधारणा करणे तसेच या उपक्रमा अंतर्गत उभारण्यांत येणा-या आय टी आणि आय.टी.इ. एस्. अंतर्गत औघ्योगिक मिळकती वर रहिवास दराने कर आकारणी मध्ये सवलत देणे.

**प्रस्ताव क्रमांक. चार** - पाणी पुरवठा विभाग यांचा अहमदनगर शहर हद्दीतील नळ कनेक्शन धारकांना मिटरद्वारे पाणी पुरवठा करणे बाबत.

**प्रस्ताव क्रमांक.पांच -** वसुली विभाग यांचा महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता धारकांनी सोलर सिस्टीम, बायोगॅस सयंत्र व रेन वॉटर हार्वेस्टींग या तीन योजना पैकी दोन योजना राबविल्यास त्यांना मालमत्ता करात दहा टक्के सुट देणे बाबत.

व **प्रस्ताव क्रमांक. सहा-** विद्युत विभाग यांचा अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सध्या वापरात असलेल्या स्ट्रीट लाईट फिटींगद्वारे येणारे विद्युत बील नवीन उर्जा कार्यक्रम (Energy Efficient) उपकरणे/ नवीन तंत्रज्ञान याचा वापर करून कमी करणे व सदर प्रकल्प BOOTतत्वावर खाजगी कंपणी द्वारे राबविणे.असे करा दराबाबतचे कार्यालयीन प्रस्ताव सभे समोर पाहिले.

सन २००७-२००८ सालचे बाबवार जमा खर्चाचे मुळ अंदाजपत्रकावर व सन २००७-२००८ या आगामी वर्षा पासून कराचे दरा मध्ये फी मध्ये वाढ /घट करणे, आकारणी करणे, सुट देणे बाबत संबंधीत विभागाने सादर केलेल्या सविस्तर प्रस्तावावर सभे मध्ये सखोल साधक बाधक चर्चा करणेत येउन ही सभा पुढील प्रमाणे शिफारस दुरूस्त्या करीत आहे.

**प्रस्ताव क्रमांक.एक** -आरोग्य विभाग - कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावा प्रमाणे सोनोग्राफी शुल्क रूपये पन्नास फक्त दर आकारणी करण्यास मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक. दोन** -आरोग्य विभाग -नागरी घन कचरा (व्यावस्थापन व हाताळणी) नियम २००० व मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार ओला व सुका कचरा वेगवेगळे डबे ठेउन साठवणूक करणे आवश्यक असल्याने सदर सुचनांचे उल्लंघन केल्यास दंड आकारणी करण्यास मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे. पंरतु कार्यालयाने सुचविलेल्या रूपये पन्नास ऐवजी रूपये वीस प्रमाणे दंडआकारणी करणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक. तीन-** माहिती तंत्रज्ञान धोरण कार्यालयाने सादर केल्याप्रमाणे जकात नियम २००५ चे नियम नंबर चार **'ब'** नंतर **क**] शासनाच्या धोरणानुसार जो उघ्योग माहिती तंत्रज्ञान उघ्योग असेल. अशा उघ्योगांना मा.आयुक्त साहेबांच्या मंजूरीने उघ्योगासाठी आयात कराव्या लागणा-या सर्व साहित्यावर जकात माफी राहिल. **ड**] माहिती तंत्रज्ञान शिक्षणाचे कार्य करणा-या सर्व शासन अनुदानीत संस्था मध्ये केवळ शैक्षणिक कार्यासाठी आयात केल्या जाणा-या सर्व मालास जकात माफी राहिल. याप्रमाणे जकात नियम २००५ मध्ये सुधारणा करण्यांस तसेच अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील हद्दीत आय.टी आणि आय.टी.इ.एस्. पॉलीसी २००३ व २००५ नुसार इंडस्ट्रीज चालू झाल्यास सदर प्रॉपर्टीज बिल्डींग प्रिमायसेस ला रेशिडेन्शिअल प्रिमायसेस ग्राहित धरून कर आकारणी करणे बाबत प्रस्तावास मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक.चार** - पाणी पुरवठा विभाग कार्यालयाने सुचविल्या प्रमाणे अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नळ कनेक्शन धारकांना मिटर द्वारे पाणी पुरवठा करणेस व त्या बध्दल त्यांना.

१] घरगुती वापर = रूपये पांच प्रती एक हजार लिटर.

२] व्यापारी वापर- रूपये पंधरा प्रती एक हजार लिटर.

३] औध्योगिक वापर -रूपये वीस प्रती एक हजार लिटर.

या प्रमाणे पाणी पट्टी आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

तसेच अ) अपार्टमेंट ( प्लॅटसिस्टीम) मधील प्लॅट धारकांसाठी मिटर ग्रुप कनेक्शन सिस्टीम चालू करण्यांत यावी. आणि अशा इमारती मधील सर्व प्लॅट धारकांनी मिटर सिस्टीम लागू करून घेतल्यास त्यांना जनरल पाणी पट्टी आकारणी करणेत येउ नये. ब) रहिवासी इमारतीचे अर्धा इंची नळ कनेक्शन धारकांनी मिटर पध्दतीचा अवलंब केले नंतर नळाला पाणी आले नाही.तर त्यांचे कडून दरमहा रूपये पन्नास प्रमाणे सरासरी पाणी पट्टीची आकारणी करण्यांत यावी. क) कमर्शिअल अर्धा इंची नळ कनेक्शन धारकांनी मिटर पध्दतीचा अवलंब केल.नंतर नळाला पाणी आले नाही तर त्यांचे कडून दरमहा रूपये तीनशे पन्नास फक्त प्रमाणे सरासरी पाणी पट्टीची आकारणी करण्यांत यावी. ड) कमर्शिअल इमारतीना मिटर पध्दतीने पाणी पुरवठा करणे (कंपलसरी) बंधनकारक करावे. याप्रमाणे शिफारसी करण्यांत येत आहेत.

**प्रस्ताव क्रमांक.पांच-** वसुली विभाग - महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता धारकांनी १] सोलर सिस्टीम. २] बायोगॅस संयत्र व , ३] रेन वॉटर हार्वेस्टींग या पैकी दोन योजना राबविल्यास त्यांना मालमत्ता करात त्याच वर्षा करितां फक्त दहा टक्के सुट देणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे. त्याच प्रमाणे नवीन बांधण्यांत येणा-या इमारतीचे मालकांना सदरच्या तीन ही योजना राबविणे कंपलसरी करण्यांत यावे.

**प्रस्ताव क्रमांक. सहा-** विद्युत विभाग -अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सध्या वापरात असलेल्या स्ट्रीट लाईट फिटींगद्वारे येणारे विद्युत बील नवीन उर्जा कार्यक्रम (Energy Efficient) उपकरणे / नवीन तंत्रज्ञान यांचा वापर करून कमी करणे बाबत कार्यालयाने सुचविल्या नुसार कार्यवाही करणेस व सदर प्रकल्प Boot तत्वावर खाजगी कंपन्याद्वारे राबविणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

महानगरपालिकेने बेग पटांगणामध्ये प्रशासकीय इमारत कम शॉपिंग कॉम्लेक्स प्रकल्प खाजगी तत्वावर न करता विकास भार निधीतुन महानगरपालिके मार्फत स्वताःच करणेत यावा. व सदरचे काम त्वरीत मार्गी लावणे साठी आवश्यक ती कार्यवाही करावी. त्याच प्रमाणे मा.आयुक्त साहेब यांनी मनोगता मध्ये सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाय योजना करणेस शिफारस करण्यांत येत आहे. तसेच मा.स्थायी समिती सदस्यांनी सुचविलेली कामे अंदाज पत्रकातील संबंधीत लेखीशिर्षा मधून करणेत यावी.

सन २००७-२००८ सालचे अंदाजपत्रका मध्ये सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चे प्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्या मध्ये दर्शविल्या नुसार अंदाजित रकमा कमी जास्त करणेस नवीन लेखा शिर्ष तयार करून त्यावर तरतुद करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत येत आहे.

अंदाज पत्रकाच्या प्रती छापून घेउन महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरील प्रमाणे सुचविलेल्या दूरूस्त्या शिफारसी सह सन २००६-२००७ सालचे सुधारित व सन २००७-२००८ सालचे बाबवार अंदाजपत्रक महानगरपालिका स्कुल बोर्डाच्या शेअर्स सह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

नियमानुसार कारवाई करावी.
सुचक :- मा.श्री. तिवारी सु.र.
अनुमोदक :- मा.श्री.घुले अ.ह
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

सोबत :- सन २००७-२००८ चे मुळ अंदाजपत्रकात केलेल्या बदलांचा तक्ता.